जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 5 MAY 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात आजपासून जागतिक पर्यावरण अभियान

| त. भा. प्रतिनिधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राच्या वतीने 'जागतिक पर्यावरण दिन पर्यावरणपूरक जीवनशैलीसाठी मिशन लाईफ अभियाना'अंतर्गत विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन केले आहे. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनांनुसार हे अभियान २५ मे ते ५ जून दरम्यान राबविण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक



प्रा. डॉ. मुरलीधर भानारकर यांनी दिली आहे.

अभियानाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते आज सकाळी होणार असून कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठ परिसरात आज ई–कचरा संकलन मोहीम आयोजित केली असून मोबाईल, चार्जर, जुने संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, केबल्स, इतर इलेक्ट्रॉनिक साहित्याचे संकलन करण्यात येणार आहे. वाढत्या पर्यावरणीय आव्हानांबाबत जनजागृती निर्माण करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या अभियानांतर्गत ऊर्जा बचत, पाणी संवर्धन, प्लास्टिकमुक्त जीवनशैली, ई–कचरा व्यवस्थापन, कचरा निर्मूलन, शाश्वत अन्नप्रणाली, आरोग्यदायी जीवनशैली या विषयांवर उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

२६ रोजी विद्यापीठ परिसरात जनजागृतीपर पोस्टर्स, डिजिटल स्क्रीनसेव्हर्स, सोशल मीडिया मोहिमेद्वारे पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला जाणार आहे. २७ रोजी 'ई–कचरा व्यवस्थापन आणि शाश्वत विकास' या विषयावर ग्रीस येथील प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, डॉ. रानिया लंपाऊ या ऑनलाइन मार्गदर्शन करणार आहेत. २९ रोजी 'ई–कचरा व्यवस्थापन व शाश्वत विकास' विषयावर सिद्धार्थ शिंदे यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. ३० रोजी 'समाज आणि शाश्वत विकास : शिक्षकांची भूमिका' विषयावर डॉ. सुधीर कुंभार यांचे ऑनलाईन व्याख्यान होणार आहे. ५ जून रोजी समारोप होणार आहे.

2 5 MAY 2026

पुण्यनगरी

# विद्यापीठात आजपासून जागतिक पर्यावरण अभियान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राच्या वतीने 'जागतिक पर्यावरण दिन : पर्यावरणपूरक जीवनशैलीसाठी मिशन लाईफ अभियान' अंतर्गत विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन केल्याची माहिती केंद्राचे संचालक प्रा. डॉ. मुरलीधर भानारकर यांनी दिली.

भारत सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हे अभियान दि. २५ मे ते ५ जून या कालावधीत राबवण्यात येणार आहे. या वर्षीच्या जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना 'हवामान बदल' ही असून, पृथ्वीसमोरील वाढत्या पर्यावरणीय आव्हानांबाबत जनजागृती निर्माण करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते दि. २५ मे रोजी होणार असून, कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित राहणार आहेत. दि. २६ मे रोजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत जनजागृतीपर पोस्टर, डिजिटल स्क्रीनसेव्हर्स आणि सोशल मीडिया मोहिमेद्वारे पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला जाणार आहे. दि. २७ रोजी 'ई-कचरा व्यवस्थापन आणि शाश्वत विकास' या विषयावर ग्रीस येथील प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ डॉ. रानिया लंपाऊ या ऑनलाईन मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर २९ रोजी 'ई-कचरा व्यवस्थापन व शाश्वत विकास' विषयावर सिद्धार्थ शिंदे यांचे विशेष व्याख्यान, ३० मे रोजी 'समाज आणि शाश्वत विकास : शिक्षकांची भूमिका' या विषयावर डॉ. सुधीर कुंभार यांचे ऑनलाईन व्याख्यान होणार आहे.

या अभियानांतर्गत विद्यापीठ परिसर व संलग्न महाविद्यालयांमध्ये ई-कचरा सर्वेक्षण आणि लेखापरीक्षण होणार आहे. गुगल फॉर्मच्या माध्यमातून हे सर्वेक्षण २५ मे ते १ जून या कालावधीत करण्यात येणार आहे. या अभियानाचा समारोप कार्यक्रम ५ जून रोजी होणार आहे.

2 5 MAY 2026

तरूण भारत

# डॉ. के. आर. यादव यांच्यावर अंत्यसंस्कार

**प्रतिनिधी**, कोल्हापूर

■ आज शिवाजी विद्यापीठात शोकसभेचे आयोजन

शिवाजी विद्यापीठाचे पहिले प्र–कुलगुरू व न्यू कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. के. आर. यादव यांच्यावर रविवारी दुपारी पंचगंगा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. डॉ. यादव यांचे शनिवारी सकाळी पुणे येथे निधन झाले होते. त्यांच्या निधनाने शैक्षणिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाल्याच्या भावना मान्यवरांनी व्यक्त केल्या.

दरम्यान, डॉ. यादव यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी रविवारी सकाळी दुधाळी येथील निवासस्थानी ठेवले होते. यावेळी शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी अंत्यदर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली. यानंतर त्यांच्या निवासस्थानापासून अंत्ययात्रा काढण्यात आली. दुपारी १२ च्या सुमारास त्यांच्यावर पंचगंगा स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी अंत्यदर्शन घेतले व त्यांच्या



कुटुंबियांशी संवाद साधला. यावेळी त्यांच्यासमवेत कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर होते. आज सकाळी शिवाजी विद्यापीठात शोकसभेचे आयोजन केल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली. अंत्यसंस्कारावेळी शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, प्रा. बी. बी. साबळे, प्रा. अभयकुमार साळुंखे, डॉ. आर. बी जाधव, प्रा. डी. जी. किल्लेदार, अनिल घाटगे आदींसह शिक्षण क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

25 MAY 2026
सकाळ

# विद्यापीठात आजपासून पर्यावरणपूरक उपक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सामाजिक समावेशन अभ्यास केंद्रातर्फे 'जागतिक पर्यावरण दिन-पर्यावरणपूरक जीवनशैलीसाठी मिशन लाईफ अभियान' अंतर्गत विविध पर्यावरणपूरक उपक्रम सोमवार (ता. २५) ते ५ जून दरम्यान राबविण्यात येणार आहेत. या अंतर्गत ऊर्जा बचत, पाणी संवर्धन, प्लास्टिकमुक्त जीवनशैली, ई-कचरा व्यवस्थापन, कचरा निर्मूलन, शाश्वत अन्नप्रणाली आणि आरोग्यदायी जीवनशैली या सात प्रमुख विषयांवर विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. या अभियानाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते होईल.

2 5 MAY 2026
पुढारी

# विद्यापीठात आजपासून 'मिशन लाईफ' अभियान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्रातर्फे जागतिक पर्यावरण दिन पर्यावरणपूरक जीवनशैलीसाठी 'मिशन लाईफ अभियान' २५ मे ते ५ जून या कालावधीत राबविण्यात येणार आहे. भारत सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हे अभियान होणार असल्याची माहिती केंद्राचे संचालक प्रा. डॉ. मुरलीधर भानारकर यांनी दिली.

कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते अभियानाचे उद्‌घाटन होणार असून, कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित राहणार आहेत.

अभियानांतर्गत विद्यापीठ परिसरात ई-कचरा संकलन मोहीम, जनजागृतीपर पोस्टर्स, डिजिटल स्क्रीनसेव्हर्स, सोशल मीडिया मोहिमा तसेच विविध ऑनलाईन व्याख्याने होणार आहेत, ग्रीसच्या शिक्षणतज्ज्ञ डॉ. रानिया लंपाऊ, सिद्धार्थ शिंदे आणि डॉ. सुधीर कुंभार यांची विशेष व्याख्याने होणार आहेत.